:: यशोगाथा ::

टोमॅटो पिकातील एकात्मिक किड व्यवस्थापन

शेतकऱ्याचे नांव : श्री सुनिल आनंदराव शिंदे
पत्ता : रा.वसंतवाडी ता.मुदखेड जि.नांदेड
जमीन धारणा : 7 एकर (एकत्र कुटुंब)
पिक पद्धती : टोमॅटो, वांगी, कारले, दोडके, ऊस इत्यादी

एकात्मिक किड व्यवस्थापन

- भाजीपाला पिकावरील किड व रोग व्यवस्थापनासाठी सतत व अमर्याद रासायनिक किडनाशकांचा वापर करूनही प्रभावी किड व्यवस्थापन मिळत नव्हते.
- कृषि विज्ञान केंद्रातील तज्ञांच्या मार्गदर्शनानुसार एकात्मिक किड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करून यशस्वीपणे किड व्यवस्थापन.
- 40 मेश नायलान जाळीचा वापर करून रोपवाटीकेत प्रोट्रे व कोकोपीट मध्ये दर्जेदार व रोगमुक्त रोपांची निर्मिती.
- 'अर्क रक्षक' या तिहेरी रोग प्रतिकारक वाणाची लागवड.
- झेंडू, चवळी, मका इत्यादी पिकाची सापळा पिक म्हणून चारही बाजूनी लागवड.
- कामगंध सापळे, पिवळे व निळी चिकट सापळ्यांचा वापर.
- निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, ट्रायकोड्रर्मा, मेटारायझियम, बायोमिक्स इत्यादी जैविक व वनस्पतीजन्य किडनाशकाचा वापर.
- गरजेनुसार आय.पी.एम. शिफारसीत रासायनिक किटक नाशकांचा वापर

तंत्रज्ञानाचा वापर

अ.क्र.	तपशील	प्रात्यक्षिक प्लॉट	शेतकऱ्याचा प्लॉट
1.	रोप तयार करणे	मच्छरदानी जाळी मध्ये	उघड्यावर
2.	सापळा / अडथळा पिक	मका व चवळी	नाही
3.	वाण व रोगाची तीव्रता	अर्क रक्षक 3.8 ते 7%	गंगा - 505, 30 ते 50%
4.	कामगंध व चिकट सापळे वापर	केलेला होता	नाही
5.	जैविक किडनाशक व बुरशी नाशकांचा वापर	ट्रायकोड्रर्मा, मेटारायझियम, दशपर्णी, निंबोळी अर्क सह रासायनिक किडनाशक	फक्त रासायनिक किडनाशक
6.	एकूण फवारण्या	09	23
7.	पिक संरक्षण खर्च (रू.)	रू.10500/-	रू.30,300/-
8.	उत्पादन	24 टन	20 टन
9.	एकूण उत्पन्न (रू.)	रू.3,99,840/-	रू.3,33,200/-
10.	उत्पादन खर्च	रू.78,000/-	रू.98,200/-
11.	निव्वळ उत्पन्न (रू.)	रू.3,41,840/-	रू.2,45,700/-
12.	खर्च नफा गुणोत्तर (B : C Rato)	1 : 3.38	1 : 2.50

एकात्मिक किड व्यवस्थापन

एकात्मिक किड व्यवस्थापन पद्धतीचा वापर गावातील इतर शेतकऱ्यांनी अवलंबिला. कामगंध सापळे, किड व रोग प्रतिकारक वाणांची निवड, जैविक व वनस्पतीजन्य किडनाशकांचा वापर, रासायनिक किडनाशकांचा मर्यादीत वापर.

प्रशिक्षण

रोपवाटीका

सापळ्यांचा वापर

सापळा पिक

संरक्षक पिक